दैनिक
# मुक्तागिरी
थेट संवाद आपल्याशी...!

■ गुरुवार, दि. २४ फेब्रुवारी २०२२
www.emuktagiri.in

## आविष्कार संशोधन स्पर्धेत छ. शिवाजी कॉलेजचे यश



**सातारा :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती कॉलेजच्या प्राध्यापक व विद्यार्थिनीने शिवाजी विद्यापीठ येथे घेण्यात आलेल्या आविष्कार संशोधन स्पर्धेत भरीव यश मिळविले. इतिहास विभागातील संशोधक प्रा.मनोहर सुभाष निकम यांनी 'आधुनिक काळातील शेतकन्यासाठीसाठी महात्मा फुले यांच्या विचारांची गरज यावर आपले संशोधन सादर केले. शिक्षक स्तरातून सादर केलेल्या या शोधनिबंधास मानव्यशास्त्रे, भाषा आणि कला विभागात शिवाजी विद्यापीठास प्रथम क्रमाक मिळाला. तसेच महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील संशोधक प्राध्यापक प्रशांत सोमनाथ प्रक्षाळे यांनी कृषी कायदे २०२० या बद्दल आपले संशोधन सादर केले. शिक्षक स्तरातून सादर केलेल्या या संशोधनास कृषी व पशुविद्या विभागात शिवाजी विद्यापीठमध्ये दुसरा क्रमांक मिळाला. तसेच महाविद्यालयातील मानसशास्त्र विभागातील बी.ए.भाग ३ ची विद्यार्थिनी कु.अस्मिता बाबासो डांगे हिने 'नोकरी करणाऱ्या घरातील आणि घरकामात असणारया स्त्रियामधील परकेपणा आणि ताणतणाव व्यवस्थापन याचा अभ्यास' .या विषयावर आपला शोधनिबंध सादर केला.तिला जिल्हा स्तरावर मानव्यविद्या,भाषा,व ललित कला संशोधन विभागात तिसरा क्रमांक मिळाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, आविष्कार संशोधन प्रकल्प प्रमुख डॉ. एस. एम. गावडे, गुणवत्ता हमी कक्ष विभाग प्रमुख उपप्राचार्य प्रोफेसर डॉ. अनिलकुमार वावरे, उपप्राचार्य डॉ. रोशनआरा शेख, उपप्राचार्य डॉ. रामराजे माने देशमुख, अंतर्गत शैक्षणिक देखरेख समितीचे प्रमुख प्रोफेसर डॉ. सुभाष बाघमारे व डॉ. आर. आर. साळुंखे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख व स्टाफ वेल्फेअर विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. शिवाजी पाटील, इतिहास विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. धनाजी मासाळ, मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ.गणेश लोखंडे, संशोधन समिती प्रमुख डॉ. अभिजित पोरे, संशोधन समिती व स्टाफ इत्यादींनी त्यांचे अभिनंदन केले.

ग्रंथपाल

प्राचार्य